सकाळ

# कर्मवीरांमुळेच शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण

## अनिल कदम : के. के. वाघ संस्थेत वाघ, बोरस्ते यांना आदरांजली

सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. २२ : कर्मवीर काकासाहेब वाघ यांचा राजकारणातील करारीपणा वाखाणण्याजोगा होता. कामाचा दर्जा कसा टिकून राहील, यावर त्यांनी नेहमी भर दिला. काकासाहेब वाघ व माधवराव बोरस्ते या समाजधुरीणांचे कार्य निरंतर चालणार असून, शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत शैक्षणिक विकास या कर्मवीरांमुळे झाला असल्याचे प्रतिपादन माजी आमदार अनिल कदम यांनी केले.**



**नाशिक :** के. के. वाघ महाविद्यालयात काकासाहेब वाघ व माधवराव बोरस्ते यांना अभिवादनप्रसंगी (डावीकडून) मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, शकुंतलाताई वाघ, माजी आमदार अनिल कदम, संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, कादवाचे अध्यक्ष श्रीराम शेटे, डॉ. सुनील ढिकले, माणिकराव बोरस्ते.

के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे कै. देवराम सयाजी तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर कै. रतनशी हरिदास उदेशी व सहकारमहर्षी कै. माधवराव बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात ऑनलाइन व ऑफलाइन स्वरूपात संपन्न झाला. याप्रसंगी विशेष उपस्थिती म्हणून माजी आमदार अनिल कदम व मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले उपस्थित होते. कादवा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त शकुंतलाताई वाघ, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, माणिकराव बोरस्ते, अरविंद कारे, अजिंक्य वाघ उपस्थित होते. समीर वाघ यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविकातून संस्थेबद्दल माहिती दिली.

राजश्री शाहू महाराज व महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव कर्मवीर वाघ यांच्यावर होता. सहकार व शिक्षण क्षेत्रात त्यांनी अतुलनीय काम केले. मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेच्या स्थापनेत त्यांचा सक्रिय सहभाग होता. काकासाहेब वाघ यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न मोठ्या तळमळीने सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर कै. बाळासाहेब वाघ यांनी हा वारसा पुढे चालवला, असे प्रतिपादन डॉ. सुनील ढिकले यांनी केले. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले.

### सहकार, शिक्षणक्षेत्रातही महत्त्वाचे योगदान

**कर्मवीरांनी केलेल्या कार्याची सर्वसामान्यांना प्रेरणा मिळण्यासाठी पुण्यस्मरण कार्यक्रम साजरे केले जातात. कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकारमहर्षी तात्यासाहेब बोरस्ते, काकूशेट उदेशी यांच्या अथक प्रयत्नामुळे संस्था उभी राहिली. कर्मवीर काकासाहेब यांच्यानंतर सहकारमहर्षी तात्यासाहेब बोरस्ते यांनी सहकार व शिक्षण क्षेत्रात कार्य केले. कै. बाळासाहेब यांनी ते पुढे नेले. त्यांचेही मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन श्रीराम शेटे यांनी अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले.**

# के. के. वाघ संस्थेतर्फे संयुक्त पुण्यतिथी कार्यक्रमामध्ये कर्मवीरांना अभिवादन

**प्रतिनिधी | नाशिक**

के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे कै. देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर कै. रतनशी हरिदास उदेशी व सहकार महर्षी कै. माधवराव उर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरणानिमित्त मंगळवारी (दि. २२) संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात माजी आमदार अनिल कदम यांच्या उपस्थितीत आदरांजली वाहण्यात आली.



यप्रसंगी मविप्रचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले उपस्थित होते. कादवा कारखान्याचे अध्यक्ष श्रीराम शेटे यांनी हे अध्यक्षस्थानी होते. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या उपेक्षित व्यक्ती व घटकाचा विकास व्हावा यासाठी के. के. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना झाली, असे प्रतिपादन माजी आमदार कदम यांनी केले. राजर्षी शाहू महाराज व महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांचा प्रभाव कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या जीवनावर होता. त्यांच्यानंतर कै. बाळासाहेब (भाऊ) वाघ यांनी हा वारसा पुढे चालवला, असे प्रतिपादन डॉ. ढिकले यांनी केले.

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# काकासाहेब वाघ व माधवराव बोरस्ते यांचे निरंतर कार्य : अनिल कदम

**◆ नाशिक (प्रतिनिधी):**

शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या उपेक्षित व्यक्ती व घटकाचा विकास व्हावा. या साठी शिक्षण संस्थांची स्थापणा झाली. तसेच कर्मवीर काकासाहेब वाघ यांचा राजकारणातील करारीपणा वाखाणण्याजोगा होता. कामात दर्जा कसा टिकून राहील, यावर त्यांनी नेहमी भर दिला. त्याचाच सकारात्मक परिणाम म्हणजे के के वाघ शिक्षण संस्थेने नावलौकिक प्राप्त केला. काकासाहेब वाघ व माधवराव बोरस्ते यांचे कार्य निरंतर चालणार आहे, असे प्रतिपादन माजी आमदार अनिल कदम यांनी केले.



के के वाघ शिक्षण संस्था, नाशिक तर्फे कै. देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर कै. रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी व सहकार महर्षी कै. माधवराव उर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम मंगळवार,( दि. २२ जुलै ) रोजी संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालय येथे ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात संपन्न झाला. याप्रसंगी विशेष उपस्थिती म्हणून निफाडचे माजी आमदार अनिल कदम व मराठा विद्या समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले उपस्थित होते. कादवा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे यांनी हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्तशकुंतलाताई वाघ, मराठा विद्या प्रसारण संस्थेचे माजी सरचिटणीस निलीमा पवार, माजी सभापती माणिकराव बोरस्ते, माजी अध्यक्ष अरविंद कारे, संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ, निफाड तालुक्यातील ग्रामस्थ व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्था गीताने झाली. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत संस्थेबद्दल माहिती दिली. त्यानंतर कर्मवीरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या जीवनपटद्वारे त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. डॉ. सुनिल ढिकले यांनी सांगितले की, सहकार व शिक्षण क्षेत्रात त्यांनी अतुलनिय काम केले. मराठा विद्या प्रसारक समाज या शिक्षण संस्थेच्या स्थापनेत सक्रिय सहभाग होता. कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी शेतक-यांचे प्रश्न मोठ्या तळमळीने सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर कै.बाळासाहेब( भाऊ) वाघ यांनी हा वारसा पुढे चालवला आहे. ऑनलाईन कार्यक्रमास १०० हून अधिक शैक्षणीक, सामाजिक,राजकीय, कृषी व सहकार क्षेत्रातील मान्यवर, पालक, संस्थेचे हितचिंतक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी केले. कार्यक्रमाची सांगता हर्षद वडजे यांनी पसायदानाने केली.

> कर्मवीरांनी केलेल्या कार्याची सर्वसामान्यांना प्रेरणा मिळावी. त्यामुळे पुण्यस्मरण कार्यक्रम साजरे केले जातात. कर्मवीर काकासाहेब वाघ, सहकारमहर्षी तात्यासाहेब बोरस्ते, काकूशेट उदेशी यांनी केलेल्या अथक प्रयत्नामुळे संस्था उभी राहीली. कर्मवीर काकासाहेब यांचे नंतर सहकारमहर्षी तात्यासाहेब बोरस्ते यांनी सहकार व शिक्षण क्षेत्रात कार्य केले. कै. बाळासाहेब(भाऊ) यांनी पुढे नेले. त्यांचे ही मोलाचे योगदान आहे.
>
> **- श्रीराम शेटे, ज्येष्ठ नेते**